## BOMBAY ACT No. XCVII OF 1958.

AN ACT TO PROVIDE FOR THE SEPARATION OF THE PERFORMANCE OF JUDICIAL AND EXECUTIVE FUNCTIONS BY OFFICERS THROUGHOUT THE STATE OF BOMBAY, TO PROVIDE FOR UNIFORMITY IN THE CODE OF CRIMINAL PROCEDURE, 1898, IN ITS APPLICATION TO THE WHOLE OF THE STATE, AND FOR MATTERS CONNECTED WITH THE PURPOSES AFORESAID.

## सन १९५८ चा मुंबई अधिनियम ९७ वा.

[राष्ट्रपति यांची संमति मिळाल्यानंतर "मुंबई राजपत्रांत" तारीख ५ डिसेंबर १९५८ रोजीं प्रथम (इंग्रजींत) प्रसिद्ध केलेला.]

सबंध मुंबई राज्यांत अधिकाऱ्यांनीं करावयाचीं न्यायदानविषयक व अंमलबजावणीविषयक कामें विभक्त करण्याची तरतूद करण्याबाबत, आणि सबंध राज्यास लागू असल्याप्रमाणेंची दंड प्रक्रिया संहिता, १८९८ हींत एकसूत्रता आणण्यासाठीं व उपरोक्त कारणांशीं संबंधित असलेल्या बाबींसाठीं तरतूद करण्याबाबत विधेयक.

ज्याअर्थी, अधिकाऱ्यांनीं करावयाचीं न्यायदानविषयक व अंमलबजावणीविषयक कामें विधिद्वारें विभक्त करण्याचें काम केवळ मुंबई राज्याच्या विवक्षित प्रदेशांतच करण्यांत आलें आहे;

आणि ज्याअर्थी, सबंध मुंबई राज्यांत अशा रीतीनें कामें विभक्त करण्यासाठीं तरतूद करणें इष्ट आहे;

आणि ज्याअर्थी, सबंध मुंबई राज्यास लागू असल्याप्रमाणेंची दंड प्रक्रिया संहिता, १८९८ हिच्या उपबंधांत एकसूत्रता आणण्यासाठीं तरतूद करणें आणि उपरोक्त कारणांशीं संबंधित असलेल्या बाबींसाठीं तरतूद करणें इष्ट आहे;

त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या नवव्या वर्षी पुढीलप्रमाणें अधिनियम करण्यांत येत आहे:—

लघु संज्ञा, व्याप्ति व प्रारंभ.

१. (१) या अधिनियमास मुंबईचा न्यायदानविषयक व अंमलबजावणीविषयक कामें विभक्त करण्याबाबत (व्याप्ति वाढविणें) व दंड प्रक्रिया संहिता (एकसूत्रता आणण्यासाठीं तरतूद करणें) अधिनियम, १९५८ असें म्हणावें.

(२) तो सबंध मुंबई राज्यास लागू आहे.

(३) तो, राज्य सरकार राजपत्रांत प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारें जी तारीख नेमील त्या तारखेस अंमलांत येईल.

सबंध राज्यांत न्यायदानविषयक व अंमलबजावणीविषयक कामें विभक्त करणें व दंड प्रक्रिया संहिता हींत एकसूत्रता आणणें आणि आनुषंगिक तरतुदी.

२. सबंध मुंबई राज्यांत अधिकाऱ्यांनीं करावयाचीं न्यायदानविषयक व अंमलबजावणीविषयक कामें विधिद्वारें विभक्त करण्याच्या कारणासाठीं, तसेंच सबंध मुंबई राज्यास लागू असल्याप्रमाणेंची दंड प्रक्रिया संहिता, १८९८ हिच्या उपबंधांत एकसूत्रता आणण्यासाठीं, या अधिनियमाच्या प्रारंभानंतर (दुसऱ्या राज्यांत घातलेले प्रदेश वगळून), पुनर्रचनेपूर्वीच्या मुंबई राज्यांत अशा प्रारंभाच्या लगतपूर्वी अंमलांत असल्याप्रमाणेंची दंड प्रक्रिया संहिता, १८९८ (जिचा यांत यापुढें "उक्त संहिता" असा उल्लेख केला आहे) ही, सबंध मुंबई राज्यांत त्याप्रमाणेंच अंमलांत राहील ; आणि तदनुसार—

(अ) (१) सध्या मुंबई राज्याचा सौराष्ट्र प्रदेश, कच्छ प्रदेश, हैदराबाद प्रदेश किंवा विदर्भ विभाग ज्या प्रदेशांचा मिळून होतो त्या प्रदेशांपैकीं कोणत्याहि प्रदेशापुरतीच उक्त संहिता लागू करतांना उक्त संहितेच्या उपबंधांत कोणत्याहि विधिद्वारें केलेल्या सर्व सुधारणा (मग त्या उक्त संहितेंत रूपभेद करून केलेल्या असोत, तींतील मजकुराऐवजीं दुसरा मजकूर घालून केलेल्या असोत, मजकूर गाळून केलेल्या असोत, तींत नवीन उपबंध दाखल करून केलेल्या असोत, तींत जादा मजकूर घालून केलेल्या असोत किंवा अन्यथा केलेल्या असोत) आणि विशेषतः या अधिनियमास जोडलेल्या पहिल्या अनुसूचींत निर्दिष्ट केलेल्या अधिनियमांद्वारें उक्त संहितेंत केलेल्या सुधारणा अंमलांत असण्याचें बंद होईल व त्या रद्द होतील ; आणि

(२) (दुसऱ्या राज्यांत घातलेले प्रदेश वगळून) पुनर्रचनेपूर्वीच्या मुंबई राज्यास लागू केल्याप्रमाणेंच्या उक्त संहितेंत केलेल्या व या अधिनियमाच्या प्रारंभीं अंमलांत असलेल्या सर्व सुधारणा राज्याच्या उरलेल्या भागास लागू करण्यांत आल्या आहेत असें समजण्यांत आलें पाहिजे आणि त्या भागांत अंमलांत असतील आणि तदनुसार उक्त संहितेचे संबंधित उपबंध सुधारण्यांत आले आहेत असें समजण्यांत आलें पाहिजे (मग ते रूपभेद करून सुधारण्यांत आले असोत, त्यांऐवजीं दुसरे उपबंध घालून सुधारण्यांत आले असोत, त्यांतील उपबंध गाळून सुधारण्यांत आले असोत, नवीन उपबंध घालून सुधारण्यांत आले असोत, त्यांत जादा मजकूर घालून सुधारण्यांत आले असोत किंवा अन्यथा सुधारण्यांत आले असोत);

(ब) (उक्त संहिता खेरीज करून इतर) केंद्रीय अधिनियम, पुनर्रचनेपूर्वीच्या मुंबई राज्यास लागू करतांना त्यांत, मुंबईचा न्यायदानविषयक व अंमलबजावणीविषयक कामें विभक्त करण्याबाबत अधिनियम, १९५१, मुंबईचा दंड प्रक्रिया संहिता सुधारणा अधिनियम, १९५३ आणि मुंबईचा न्यायदानविषयक

व अंमलबजावणीविषयक कार्यें विभक्त करण्याबाबत (पुरवणी) अधिनियम, १९५४ यांकडून केलेल्या सुधारणा, मुंबई राज्याच्या ज्या उरलेल्या भागास असे केंद्रीय अधिनियम लागू आहेत त्या भागास लागू करण्यांत आल्या आहेत असें समजण्यांत आलें पाहिजे आणि त्या भागांत त्या अंमलांत असतील ; आणि तदनुसार केंद्रीय अधिनियमांतील हे उपबंध राज्याच्या निरनिराळ्या प्रदेशांस लागू करतांना त्यांत सुधारणा करण्यांत आल्या आहेत असें समजण्यांत आलें पाहिजे (मग त्या वगळून केलेल्या असोत, त्यांतील मजकुराऐवजीं दुसरा मजकूर घालून केलेल्या असोत, त्यांतील मजकूर गाळून केलेल्या असोत, त्यांत नवीन उपबंध दाखल करून केलेल्या असोत, त्यांत जादा मजकूर घालून केलेल्या असोत किंवा अन्यथा केलेल्या असोत) आणि त्या केंद्रीय अधिनियमांत आधींच केलेल्या आणि राज्याच्या कोणत्याहि प्रदेशांत या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी अंमलांत असलेल्या ज्या सुधारणा आतां लागू करण्यांत आलेल्या सुधारणांशीं विरोधी असतील किंवा त्यासारख्या असतील त्या सुधारणा रद्द करण्यांत याव्या ;

(क) दुसऱ्या अनुसूचीचे भाग १, २, ३ व ४ यांत निर्दिष्ट केलेल्या विधींची, उक्त अनुसूचीच्या चौथ्या स्तंभांत निर्दिष्ट करण्यांत आलेल्या रीतीनें व मर्यादे-पर्यंत सुधारणा करण्यांत यावी ;

(ड) उक्त संहिता मुंबई राज्यास लागू करतांना तिचीं कलमें ६ व ७ यांत "दुसऱ्या राज्यांत घातलेले प्रदेश वगळून पुनर्रचनेपूर्वीच्या मुंबई राज्यांत" या शब्दांऐवजी "मुंबई राज्यांत" हे शब्द दाखल करावे, आणि राज्य व समवर्ती विषय (मुंबई अनुकूलन) आदेश, १९५७ अंमलांत आल्यावर केंद्रीय अधिनियमांच्या अनुसूचींतील दंड प्रक्रिया संहिता, १८९८ हीसंबंधींच्या सर्व नोंदी गाळण्यांत याव्या.

दुसऱ्या सुधारणांमुळें या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी काढलेल्या अधिसूचना, आदेश वगैरे अवैध न ठरणें.

३. उक्त संहितेंत किंवा इतर कोणत्याहि केंद्रीय अधिनियमांत किंवा अनुसूचींत निर्दिष्ट केलेल्या राज्य अधिनियमांत, ज्या रीतीनें, ज्या प्राधिकाऱ्यांकडून किंवा निधींमधून किंवा तदनुसार कोणतेहि अधिकार चालविण्याजोगे असतील त्या रीतींत, प्राधिकारांत किंवा निधींत बदल होईल अशा रीतीनें सुधारणा करणाऱ्या या अधिनियमाच्या उपबंधामुळें, या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी योग्य रीतीनें काढलेली कोणतीहि अधिसूचना, दिलेला कोणताहि आदेश, दिलेलें कोणतेंहि वचन, केलेली कोणतीहि जप्ति, केलेला कोणताहि उप-विधि, नियम किंवा विनियम किंवा योग्य रीतीनें केलेली कोणतीहि गोष्ट, अवैध ठरणार नाहीं ; आणि अशी कोणतीहि अधिसूचना, आदेश, वचन, जप्ति, उप-विधि, नियम किंवा विनियम किंवा गोष्ट, जणूं ती सक्षम प्राधिकाऱ्यानें या अधिनियमाच्या प्रारंभानंतर आणि अशा बाबतींत त्या वेळीं लागू असलेल्या उपबंधानुसार करण्यांत आली होती असें समजून, तत्सम रीतीनें व तत्सम मर्यादेपर्यंत व तत्सम परिस्थितींत रद्द करण्याचा, तींत बदल करण्याचा किंवा फिरविण्याचा अधिकार आहे.

४. (१) या कलमांत तरतूद केली असेल ती खेरीज करून, या अधिनियमांतील बचाव. कोणत्याहि गोष्टीमुळें—

(अ) कोणत्याहि प्रदेशांत, ज्या तारखेस या अधिनियमाचे उपबंध त्यांत अंमलांत येतील त्या तारखेपूर्वी केलेल्या किंवा करूं दिलेल्या कोणत्याहि गोष्टीची वैधता, अवैधता किंवा परिणाम ;

(ब) अशा तारखेपूर्वी आधींच संपादन केलेला किंवा प्राप्त झालेला कोणताहि हक्क, विशेषाधिकार, जबाबदारी किंवा पात्रता ;

(क) अशा तारखेपूर्वी कोणत्याहि कृत्याच्या संबंधांत प्राप्त झालेली किंवा केलेली कोणतीहि शास्ति, जप्ति किंवा शिक्षा ;

(ड) असा हक्क, विशेषाधिकार, जबाबदारी, पात्रता, शास्ति, जप्ति किंवा शिक्षा यासंबंधींची कोणतीहि चौकशी, वैध कारवाई किंवा उपाययोजना ;

यांस बाध येणार नाहीं आणि या अधिनियमाबरून सुधारल्याप्रमाणेंच्या संबंधित अधिनियमांच्या उपबंधांनुसार अशी कोणतीहि चौकशी, वैध कारवाई किंवा उपाययोजना दाखल करतां येईल, चालू ठेवतां येईल किंवा अंमलांत आणतां येईल किंवा अशी कोणतीहि शास्ति, जप्ति किंवा शिक्षा करतां येईल.

(२) ज्या तारखेस हा अधिनियम अंमलांत येईल त्या तारखेस कोणत्याहि फौजदारी न्यायाधिशापुढें किंवा न्यायालयापुढें अनिर्णित असलेल्या सर्व वैध कारवाया, जर अशा फौजदारी न्यायाधिशास किंवा न्यायालयास, या अधिनियमाबरून सुधारल्या-प्रमाणेंच्या संबंधित अधिनियमांच्या उपबंधान्वयें अशा कारवायांच्या संबंधांत क्षेत्राधिकार असण्याचें बंद होईल तर, या अधिनियमान्वयें सुधारल्याप्रमाणेंच्या संबंधित अधिनियमाच्या उपबंधान्वयें क्षेत्राधिकार असणाऱ्या फौजदारी न्यायाधिशाकडे किंवा न्यायालयाकडे वर्ग होतील आणि अशा फौजदारी न्यायाधिशानें किंवा न्यायालयानें त्यांची सुनावणी केली पाहिजे व त्या निकालांत काढल्या पाहिजेत आणि अशा फौजदारी न्यायाधिशास किंवा न्यायालयास, जणूं त्या अशा फौजदारी न्यायाधिशापुढें किंवा अशा न्यायालयापुढें प्रारंभीं दाखल करण्यांत आल्या होत्या असें समजून त्यासंबंधींचे सर्व अधिकार व क्षेत्राधिकार असतील.

अडचणी दूर करण्याचा अधिकार.

५. या अधिनियमाचे उपबंध अंमलांत आणतांना कोणतीहि अडचण उद्भवली तर, राज्य सरकारास, आदेशाद्वारें, अशा उपबंधांशीं विसंगत नसलेली आणि कलम २ मध्यें दिलेले उद्देश साध्य करण्यासाठीं आणि अशी अडचण दूर करण्याच्या कारणासाठीं त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशी कोणतीहि गोष्ट करण्याचा अधिकार आहे.

## पहिली अनुसूचि.

[कलम २(अ) (१) पहा.]

| १ | २ |
|---|---|
| सौराष्ट्र विधी ... | १. सौराष्ट्राचा न्यायदानविषयक व अंमलबजावणीविषयक कामें विभक्त करण्याबाबत अधिनियम, १९५२ (सन १९५२चा सौराष्ट्र अधिनियम ४था). |
| | २. दंड प्रक्रिया संहिता (सौराष्ट्र सुधारणा) अधिनियम, १९५५ (सन १९५५चा सौराष्ट्र अधिनियम ४५वा). |
| मध्यप्रदेश विधी ... | ३. दंड प्रक्रिया संहिता (मध्यप्रांत व वऱ्हाड सुधारणा) अधिनियम, १९३६ (सन १९३६चा मध्यप्रांत व वऱ्हाड अधिनियम १९वा). |
| | ४. मध्यप्रदेश दंड प्रक्रिया संहिता (सुधारणा) अधिनियम, १९५० (सन १९५०चा मध्यप्रदेश अधिनियम ५०वा). |

## दुसरी अनुसूचि.

[ कलम २ (क) पहा. ]

### भाग १.

### मुंबई राज्याच्या सौराष्ट्र प्रदेशांत अंमलांत असलेले अधिनियम.

| वर्ष. | क्रमांक. | लघु संज्ञा. | कोठवर सुधारणा केल्या तें. |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १८९२ | १ | मुंबईचा जिल्ह्यांत देवी टोंचण्याबाबत अधिनियम, १८९२. | कलम २३, पोट-कलम (१) यांत, "मॅजिस्ट्रेटास" या शब्दाऐवजीं "तालुका फौजदारी न्यायाधिशास" हे शब्द दाखल करावे. |
| १९५१ | ३१ | सौराष्ट्र अभ्यस्त अपराधी निर्बंध अधिनियम, १९५१. | (१) कलम ११ मध्यें,—<br>(१) पोट-कलम (१) ऐवजीं पुढील पोट-कलम दाखल करावं :—<br>"(१) जेव्हां कोणत्याहि इसमाविरुद्ध निर्बंधवजा आदेश देण्यांत आला असेल तेव्हां, असा आदेश देणाऱ्या न्यायालयास किंवा फौजदारी न्यायाधिशास किंवा कलम १३ अन्वयें अशा आदेशाविरुद्ध ज्याकडे अपील करतां येईल अशा न्यायालयास किंवा फौजदारी न्यायाधिशास, कोणत्याहि वेळीं स्वतः होऊन किंवा अशा इसमानें अर्ज केल्यावर व लेखी नमूद करावयाच्या पुरेशा कारणांसाठीं असा निर्बंधवजा आदेश रद्द करणारा किंवा त्यांत फेरफार करणारा आदेश देण्याचा अधिकार आहे.";<br>(२) पोट-कलम (३) हें गाळण्यांत यावें.<br>(२) कलम १३ मध्यें,—<br>(१) कंडिका (१) हींत "फौजदारी न्यायाधिशानें" या शब्दांच्या एवजीं "अधिशासी फौजदारी न्यायाधिशानें" हे शब्द दाखल करावे;<br>(२) कंडिका (२) हींत "त्यास अधीन असलेल्या फौजदारी न्यायाधिशानें" या शब्दांऐवजीं "न्यायिक फौजदारी न्यायाधिशानें किंवा जिल्हा फौजदारी न्यायाधिशानें" हे शब्द दाखल करावे. |

| वर्ष. | क्रमांक. | लघु संज्ञा. | कोठवर सुधारणा केल्या तें. |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १९५२ | २९ | सौराष्ट्राचा कैद्यांची ओळख पटण्याबाबत अधिनियम, १९५२. | कलम ५ मधील पहिल्या परंतुकांत "पहिल्या वर्गाच्या फौजदारी न्यायाधिशानें असेल तें खेरीज करून" या शब्दांऐवजीं "जिल्हा फौजदारी न्यायाधिशानें, उप-विभागीय फौजदारी न्यायाधिशानें किंवा पहिल्या वर्गाच्या फौजदारी न्यायाधिशानें असेल तें खेरीज करून" हे शब्द दाखल करावे. |
| १९५६ | २९ | सौराष्ट्राचा मुलांबाबत अधिनियम, १९५६. | कलम ४६ मध्यें, "आणि इतरत्र" या शब्दांनीं सुरू होणाऱ्या व "फौजदारी न्यायाधिशाच्या" या शब्दांनीं संपणाऱ्या मजकुराऐवजीं पुढील मजकूर दाखल करावा:— "आणि इतरत्र जें न्यायालय अशा मुलाच्या संबंधांत या अधिनियमान्वयें कोणताहि आदेश देईल त्या न्यायालयाच्या." |

## भाग २.

### मुंबई राज्याच्या कच्छ प्रदेशांत अंमलांत असलेले अधिनियम.

| वर्ष. | क्रमांक. | लघु संज्ञा. | कोठवर सुधारणा केल्या तें. |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १८६७ | ८ | मुंबई ग्राम पोलीस अधिनियम, १८६७. | (१) कलम १ यांत पुढील परिच्छेद जादा दाखल करावा :— "ह्या अधिनियमांत वापरण्यांत आली असतांना, 'अधिशासी फौजदारी न्यायाधीश' या संज्ञेचा दण्ड प्रक्रिया संहिता, १८९८ यांत तिला जो अर्थ आहे तोच अर्थ असेल." (१८९८ चा ५.) (२) कलम ६ मध्यें, "फौजदारी न्यायाधिशाच्या" हे शब्द जेथें दुसऱ्यांदा व तिसऱ्यांदा येतात त्या दोन्हीं ठिकाणीं त्यांऐवजीं "अधिशासी फौजदारी न्यायाधिशाच्या" हे शब्द आणि "फौजदारी न्यायाधीश" ह्या शब्दांऐवजीं "अधिशासी फौजदारी न्यायाधीश" हे शब्द दाखल करावे. |

| वर्ष. १ | क्रमांक. २ | लघु संज्ञा. ३ | कोठवर सुधारणा केल्या तें. ४ |
|---|---|---|---|
| | | | (३) कलम ८ मधील "फौजदारी न्यायाधिशास" ह्या शब्दांऐवजीं "अधिशासी फौजदारी न्यायाधीश" हे शब्द दाखल करावे.<br>(४) कलम ९ मधील "१ ल्या वर्गाच्या कोणत्याहि फौजदारी न्यायाधिशाच्या" व कलम ९अ मधील "१ ल्या वर्गाच्या कोणत्याहि फौजदारी न्यायाधिशास" या शब्दांऐवजीं अनुक्रमें "जिल्हा फौजदारी न्यायाधिशाच्या" व "जिल्हा फौजदारी न्यायाधिशास" हे शब्द दाखल करावे.<br>(५) कलमें १९ व २१ मधील "फौजदारी न्यायाधिशाच्या" या शब्दांऐवजीं "अधिशासी फौजदारी न्यायाधिशाच्या" हे शब्द दाखल करावे. |
| १८९२ | १ | मुंबईचा जिल्हयांत देवी टोंचण्याबाबत अधिनियम, १८९२. | कलम २३, पोट-कलम (१) मधील "फौजदारी न्यायाधिशास" या शब्दांऐवजीं "तालुका फौजदारी न्यायाधिशास" हे शब्द दाखल करावे. |
| १९२३ | ६ | मुंबई स्थानिक मंडळ अधिनियम, १९२३. | कलम ११३ मध्यें,—<br>(१) "फौजदारी न्यायाधिशानें किंवा अशा फौजदारी न्यायाधिशांच्या मंडळानें" ह्या मजकुराऐवजीं "न्यायिक फौजदारी न्यायाधिशानें किंवा अशा फौजदारी न्यायाधिशांच्या मंडळानें" हा मजकूर दाखल करावा.<br>(२) "राज्य सरकारच्या किंवा जिल्हा फौजदारी न्यायाधिशाच्या" या मजकुराऐवजीं "सेशन न्यायाधिशाच्या" हे शब्द दाखल करावे. |
| १९२५ | १८ | मुंबई बरो नगरपालिका अधिनियम, १९२५. | (१) कलम ११०, पोट-कलम (१) ऐवजीं पुढील मजकूर दाखल करावा:—<br>"(१) कलम १०४, पोट-कलम (१) अन्वयें दिलेल्या बिलांत समाविष्ट केलेल्या कोणत्याहि मागणीविरुद्ध करावयाचीं अपिलें ह्या प्रकारच्या प्रकरणांचा इन्साफ सेशन न्यायाधिशाच्या निदेशानुसार ज्या कोणत्याहि न्यायिक फौजदारी न्यायाधिशानें किंवा अशा फौजदारी न्यायाधिशांच्या मंडळानें करावयाचा त्या न्यायाधिशाकडे किंवा मंडळाकडे करतां येतील.". |

| वर्ष. १ | क्रमांक. २ | लघु संज्ञा. ३ | कोठवर सुधारणा केल्या तें. ४ |
|---|---|---|---|
| | | | (२) कलम १८०, पोट-कलम (३) मधील "दुसऱ्या वर्गाच्या अधिकारांपेक्षा कमी नसलेले अधिकार चालविणाऱ्या फौजदारी न्यायाधिशाची" या मजकुराऐवजीं "तालुका फौजदारी न्यायाधिशाची" हा मजकूर दाखल करावा.<br>(३) कलम १८३, पोट-कलम (१) मधील "पहिल्या वर्गाच्या फौजदारी न्यायाधिशापुढें" या शब्दांऐवजीं "तालुका फौजदारी न्यायाधिशापुढें" हे शब्द दाखल करावे.<br>(४) कलम १८९ मधील "पहिल्या वर्गाच्या फौजदारी न्यायाधिशास" या शब्दांऐवजीं "अधिशासी फौजदारी न्यायाधिशास" हे शब्द दाखल करावे.<br>(५) कलम १९६ मधील "पहिल्या वर्गाच्या फौजदारी न्यायाधिशास" या शब्दांऐवजीं "अधिशासी फौजदारी न्यायाधिशास" हे शब्द दाखल करावे. |
| १९३८ | १९ | मुंबई अपराधी परिवीक्षा अधिनियम, १९३८. | कलम ३ मधील,—<br>(१) पोट-कलम (१) च्या कंडिका (क) व (ड) गाळाव्यात, आणि<br>(२) पोट-कलम (३) मधील "किंवा उपविभागीय फौजदारी न्यायाधिशाकडे" हे शब्द गाळण्यांत यावे. |

## भाग ३.

### मुंबई राज्याच्या हैदराबाद प्रदेशामध्यें अंमलांत असलेले अधिनियम.

| वर्ष. १ | क्रमांक. २ | लघु संज्ञा. ३ | कोठवर सुधारणा केल्या तें. ४ |
|---|---|---|---|
| १३५५ फसली. | २ | जंगलाबाबत अधिनियम, १३५५ फसली. | कलम ७० मधील "सरकारनें ह्याबाबतीत खास रीतीनें अधिकार दिलेल्या जिल्हा फौजदारी न्यायाधिशास किंवा पहिल्या वर्गाच्या फौजदारी न्यायाधिशास" या मजकुराऐवजीं "उच्च न्यायालयाशीं सल्लामसलत करून राज्य सरकारनें ह्या बाबतींत खास रीतीनें अधिकार दिलेल्या पहिल्या वर्गाच्या कोणत्याहि फौजदारी न्यायाधिशास" हा मजकूर दाखल करावा. |

| वर्ष. | क्रमांक. | लघु संज्ञा. | कोठवर सुधारणा केल्या तें. |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १९५१ | ३२ | हैदराबादच्या मुलांबाबत अधिनियम, १९५१. | (१) कलम ३ मध्यें,—<br>(१) " (क) जिल्हा फौजदारी न्यायाधिशानें, (ड) शहर फौजदारी न्यायाधीशांच्या न्यायालयांतील प्रमुख फौजदारी न्यायाधिशानें " या मजकुराऐवजीं " (क) पहिल्या वर्गाच्या फौजदारी न्यायाधीशानें " हा मजकूर दाखल करावा;<br><br>(२) "(फ) असे सर्व किंवा कोणतेहि अधिकार चालविण्यासाठीं सरकारनें खास अधिकृत केलेल्या कोणत्याहि फौजदारी न्यायाधिशानें " हा मजकूर गाळण्यांत यावा.<br><br>(२) कलम ४ मध्यें,—<br>(१) पोट-कलम (१) मधील, "ज्या जिल्हा फौजदारी न्यायाधीशाच्या हाताखालीं तो असेल त्या जिल्हा फौजदारी न्यायाधीशाकडे " या मजकुराऐवजीं "पहिल्या वर्गाच्या फौजदारी न्यायाधीशाकडे " हा मजकूर दाखल करावा. ;<br><br>(२) पोट-कलम (२) मधील "जिल्हा फौजदारी न्यायाधीशास किंवा फौजदारी न्यायाधीशास" या मजकुराऐवजीं "फौजदारी न्यायाधीशास" हा मजकूर दाखल करावा.<br><br>(३) कलम ६१, पोट-कलम (१) यांत कंडिका (अ) व (ब) ऐवजीं पुढील कंडिका दाखल करावी:—<br>" (अ) बाल न्यायालयानें किंवा फौजदारी न्यायाधीशानें दिलेला असेल तर, सेशन न्यायालयाकडे करतां येईल." |
| १९५३ | १२ | हैदराबाद अपराधी परिवीक्षा अधिनियम, १९५३. | कलम ५ मधील, "किंवा उपविभागीय फौजदारी न्यायाधीशाकडे " हा मजकूर गाळण्यांत यावा. |

| वर्ष. | क्रमांक. | लघु संज्ञा. | कोठवर सुधारणा केल्या तें. |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १९५४ | २२ | हैदराबाद अभ्यस्त अपराधी (निर्बंधन व वसाहत) अधिनियम, १९५४. | (१) कलम ११ मध्यें,—<br>(१) पोट-कलम (१) ऐवजीं पुढील मजकूर दाखल करावा :—<br>"(१) जेव्हां कोणत्याहि इसमाविरुद्ध निर्बंधवजा आदेश देण्यांत आला असेल तेव्हां, असा आदेश देणाऱ्या न्यायालयास किंवा फौजदारी न्यायाधिशास किंवा कलम १३ अन्वयें अशा आदेशाविरुद्ध ज्याकडें अपील करतां येईल अशा न्यायालयास किंवा फौजदारी न्यायाधिशास, कोणत्याहि वेळीं, स्वतः होऊन किंवा अशा इसमानें अर्ज केल्यावर व लेखी नमूद करावयाच्या पुरेशा कारणांसाठीं असा निर्बंधवजा आदेश रद्द करणारा किंवा त्यांत फेरफार करणारा आदेश देण्याचा अधिकार आहे."<br>(२) पोट-कलम (३) गाळण्यांत यावें.<br>(२) कलम १३ मध्यें,—<br>(१) कंडिका (१) मधील "फौजदारी न्यायाधिशानें" या शब्दांऐवजीं "अधिशासी फौजदारी न्यायाधिशानें" हे शब्द दाखल करावे ;<br>(२) कंडिका (२) मधील "असा आदेश" या शब्दांनंतर "न्यायिक फौजदारी न्यायाधिशानें किंवा" हे शब्द जादा दाखल करावे. |
| १९५४ | २९ | हैदराबाद तुरुंगाबाबत अधिनियम, १९५४. | कलम ५३ मध्यें,—<br>(१) "जिल्हा फौजदारी न्यायाधिशाच्या, किंवा" हे शब्द गाळण्यांत यावे ;<br>(२) पहिलें परंतुक गाळावें, आणि<br>(३) दुसऱ्या परंतुकांतील "तसेंच" या शब्दाऐवजीं "परंतु" हा शब्द दाखल करावा. |
| १९५६ | १५ | हैदराबाद बोर्स्टल शाळांबाबत अधिनियम, १९५६. | (१) कलम ७ च्या कंडिका (क), (ड) व (ई) यांऐवजीं पुढील कंडिका दाखल करावी :—<br>"(क) पहिल्या वर्गाच्या फौजदारी न्यायाधिशानें".<br>(२) कलम ८ मधील "जिल्हा फौजदारी न्यायाधिशाकडे", "जिल्हा फौजदारी न्यायाधिशास" या शब्दांऐवजीं अनुक्रमें "पहिल्या वर्गाच्या फौजदारी न्यायाधिशाकडे" व "पहिल्या वर्गाच्या फौजदारी न्यायाधिशास" हे शब्द दाखल करावे. |

भाग ४.

मुंबई राज्याच्या विदर्भ विभागांत अंमलांत असलेले अधिनियम.

| वर्ष. | क्रमांक. | लघु संज्ञा. | कोठवर सुधारणा केल्या तें. |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १८८० | १३ | देवी टोंचण्याबाबत अधिनियम, १८८०. | कलम १८ मधील "जिल्हा फौजदारी न्यायाधिशाकडे, किंवा राज्य सरकार, किंवा जिल्हा फौजदारी न्यायाधीश ह्या संबंधांत वेळोवेळीं नेमील अशा फौजदारी न्यायाधिशाकडे" या मजकुराऐवजीं "राज्य सरकार ह्या संबंधांत वेळोवेळीं नेमील अशा फौजदारी न्यायाधिशाकडे" हा मजकूर दाखल करावा. |
| १९२८ | ९ | मध्यप्रांत व वऱ्हाड बोर्स्टल अधिनियम, १९२८. | (१) कलम ५ मध्यें,—<br>(१) पोट-कलम (२) मधील "जिल्हा फौजदारी न्यायाधिशास किंवा उप-विभागीय फौजदारी न्यायाधिशास" या शब्दांऐवजीं "पहिल्या वर्गाच्या फौजदारी न्यायाधिशास" हे शब्द दाखल करावे.<br>(२) पोट-कलम (३) मधील "जिल्हा फौजदारी न्यायाधिशास किंवा उप-विभागीय फौजदारी न्यायाधिशास" या शब्दांऐवजीं "फौजदारी न्यायाधिशास" हे शब्द दाखल करावे.<br>(२) कलम ७ ऐवजीं पुढील नवीन कलम दाखल करावें :— |
| | | "जिल्हा फौजदारी न्यायाधिशाचा विशेष अधिकार. | ७. वयानें सोळा वर्षांहून कमी नसलेल्या किंवा एकवीस वर्षांहून जास्त नसलेल्या कोणत्याहि पुरुषास एकाद्या अपराधाबद्दल सक्त मजुरीच्या कैदेची किंवा काळ्या पाण्यावर पाठविण्याची शिक्षा झाली असेल किंवा अशा इसमास चांगल्या वर्तणुकीकरितां तारण देण्याचा आदेश देण्यांत आलेला असून व त्यानें असें तारण-पत्र देण्यांत कसूर केल्यामुळें त्यास दंड प्रक्रिया संहिता, १८९८, हिचें कलम १२३, पोट-कलम (१) अन्वय कैद करण्यांत आलें असेल आणि अशा इसमांच्या गुन्हे करण्याच्या संवयींमुळें किंवा प्रवृत्तींमुळें किंवा वाईट वर्तणुकीच्या इसमांच्या संगतीमुळें त्यास जिल्हा फौजदारी न्यायाधिशाच्या मतें अटकावून ठेवणें इष्ट असेल त्या बाबतींत, जिल्हा फौजदारी न्यायाधिशास, त्याच्या बाबतींतील कामकाज सेशन न्यायाधिशापुढें ठेवलें पाहिजे असा आदेश देण्याचा अधिकार आहे आणि कलम ६ चीं पोट-कलमें (२) व (३) यांचे उपबंध, जणू तें कामकाज त्या कलमान्वयें पाठविलें असल्याप्रमाणें, लागू होतील." |

| वर्ष. | क्रमांक. | लघु संज्ञा. | कोठवर सुधारणा केल्या तें. |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | | | (३) कलम १२ मध्यें,—<br>(१) पोट-कलम (१) मधील "जिल्हा फौजदारी न्यायाधिशानें" हे शब्द गाळण्यांत यावे ;<br>(२) पोट-कलम (२) मधील "जिल्हा फौजदारी न्यायाधिशास" या शब्दांऐवजीं "पहिल्या वर्गाच्या फौजदारी न्यायाधिशास" हे शब्द दाखल करावे. |
| | | | (४) कलम १३ च्या पोट-कलम (१) मधील "जिल्हा फौजदारी न्यायाधिशानें" हे शब्द गाळावे. |
| | | | (५) कलम २६ मधील "जिल्हा फौजदारी न्यायाधिधिशाकडे" हे शब्द गाळावे. |
| १९२८ | १० | मध्यप्रांत व वऱ्हाड मुलांबाबत अधिनियम, १९२८. | (१) कलम ४ मधील कंडिका (क) व (ड) गाळण्यांत याव्या; आणि कंडिका (फ) मधील "किंवा राज्य सरकारनें या बाबतींत" या शब्दांनीं सुरू होणारा व "फौजदारी न्यायाधिशानें" या शब्दांनीं संपणारा मजकूर गाळण्यांत यावा. |
| | | | (२) कलम ५, पोट-कलम (१) मध्यें, "जिल्हा फौजदारी न्यायाधिशाकडे किंवा उप-विभागीय फौजदारी न्यायाधिशाकडे" या शब्दांऐवजीं "अशा रीतीनें अधिकृत केलेल्या फौजदारी न्यायाधिशाकड" हे शब्द दाखल करावे. |
| | | | (३) कलम ५३, पोट-कलम (१) च्या कंडिका (अ) व (ब) यांच्याऐवजीं पुढील मजकूर दाखल करावा :—<br>"(अ) बाल न्यायालयानें किंवा कोणत्याहि फौजदारी न्यायाधिशानें दिलेला असल्यास, सेशन न्यायाधिशाकडे करतां येईल." |

| वर्ष. | क्रमांक. | लघु संज्ञा. | कोठवर सुधारणा केल्या तें. |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १९३६ | १ | मध्यप्रांत व वऱ्हाड अपराधी परिवीक्षा अधिनियम, १९३६. | (१) कलम ४, पोट-कलम (२) मध्यें "किंवा राज्य सरकारनें" या शब्दांनीं सुरू होणारा व "फौजदारी न्यायाधिशास" या शब्दांनीं संपणारा मजकूर गाळण्यांत यावा.<br><br>(२) कलम ५ यांत, पोट-कलमें (१) व (२) मधील "जिल्हा फौजदारी न्यायाधिशाकडे किंवा उपविभागीय फौजदारी न्यायाधिशाकडे" आणि "जिल्हा फौजदारी न्यायाधिशासमोर किंवा उपविभागीय फौजदारी न्यायाधिशासमोर" या शब्दांऐवजीं अनुक्रमें "अशा रीतीनें अधिकृत केलेल्या फौजदारी न्यायाधिशाकडे" आणि "अशा रीतीनें अधिकृत केलेल्या फौजदारी न्यायाधिशासमोर" हे शब्द दाखल करावे. |
| १९५० | २ | नागपूर शहर महापालिका अधिनियम, १९४८. | कलम १६४ मध्यें पोट-कलम (१) मधील "कोणत्याहि फौजदारी न्यायाधिशानें" व "कोणत्याहि फौजदारी न्यायाधिशाकडे" या शब्दांऐवजीं अनुक्रमें "कोणत्याहि न्यायिक फौजदारी न्यायाधिशानें" व "कोणत्याहि न्यायिक फौजदारी न्यायाधिशाकडे" हे शब्द आणि "जिल्हा फौजदारी न्यायाधिशाच्या" या शब्दांऐवजीं "सेशन न्यायाधिशाच्या" हे शब्द दाखल करावे. |

(True translation)

Y. H. PITKE,

Examiner of Books and Publications, Bombay.